Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
Extn. : 3214

# University of Mumbai

**Enrolment Section**
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in
No. Enrol./ 2207 of 2012
Date : 31/07/ 2012

प्रति,
मा. प्राचार्य / प्राचार्या / संचालक / संचालिका.

विषय :- ई-सुविधा प्रकिया.

महोदय / महोदया,

नावनोंदणी Online संदर्भात दिनांक २ जुलै, २०१२ चे परिपत्रक क. BCUD/318/13 of 2012 नुसार ३१ जुलै ही महाविद्यालयांचे नावनोंदणी अर्ज Online मार्फत दाखल करावयाची शेवटची तारीख होती. परंतू परिपत्रक क. Aff./Recog.I/ICC/Admission/(2012-13)12 of 2012 दिनांक १३ जुलै, २०१२ नुसार विद्यार्थी प्रवेश मुदतवाढ ही ३१ जुलै, २०१२ पर्यन्त करण्यात आल्याने Online वर अर्ज **दाखल करण्याची मुदतवाढ ही १० ऑगस्ट, २०१२ पर्यन्त करण्यात आली आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

महाविद्यालय / संस्था यांना सुचना खालीलप्रमाणे :-

१) Online अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ दिल्याने या पूर्वीचे वेळापत्रक क. Enrol./1220/2012 दिनांक २५ मे, २०१२ प्रमाणेच नावनोंदणी अर्ज विद्यापीठात जमा करावेत. नावनोंदणी अर्ज विद्यापीठात सादर करावयाच्या वेळी परिपत्रक क. Enrol./281 of 2012 दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ व परिपत्रक क. Enrol./1102 of 2012 दिनांक १० मे, २०१२ प्रमाणे कार्यवाही करावी.

२) अभियांत्रिकी व वैद्यकिय अभ्यासक्रमास प्रवेश मिळाल्याने विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश रद्द केलेल्या सदर विद्यार्थ्यांच्या जागी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज अभियांत्रिकी व वैद्यकिय अभ्यासक्रमाचे प्रवेशफेरी प्रकियेनंतर १० दिवसांचे आत विद्यार्थ्यांचे ७५% हजेरी पुर्ण करण्याच्या प्राचार्यांच्या हमी पत्रासह विद्यापीठात सादर करावयाचे आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेश रद्द केलेल्या पावत्यांची छायांकित प्रत नावनोंदणी अर्जासह नावनोंदणी विभागात सादर करणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी.

३) जे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून Online घ्यावयाचे होते त्यांची व्याख्या अंतिम करण्याची कार्यवाही सुरू असल्याने महाविद्यालयांनी / संस्थांनी अशा अभ्यासक्रमांचे नावनोंदणीचे छापील अर्ज दरवर्षीप्रमाणे भरून नावनोंदणी विभागात सादर करावेत. सदर अभ्यासक्रमाची Online नोंदणी करावयाची झाल्यास आपणास तसे सुचित केले जाईल त्यासाठी दिनांक २३ जुलै, २०१२ रोजी दैनिक, पुण्यनगरी व सामना मधील जाहिरात अवलोकनी घ्यावी.

४) ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश मध्यवर्ती प्रवेश नियंत्रण समिती (CAP) मार्फत होतात. ( उदा. :- Engineering, Pharmacy, B.Ed./B.P.Ed ) त्यांच्या प्रवेशाची अंतिम फेरी पुर्ण झाल्यावर १० दिवसाच्या आत त्यांचे नावनोंदणी अर्ज विद्यापीठाच्या नावनोंदणी विभागात जमा करावेत.

उपकुलसचिव
(नावनोंदणी विभाग)